सहकारातून समृध्दीकडे

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

संकेतस्थळ: https://sahakarayukta.maharashtra.gov.in

---

## प्रसिध्दीपत्रक

सहकार विभागातील गट- क संवर्गातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत दिनांक १६/०८/२०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती.

सहकार विभागातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांसाठी परीक्षा दिलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त आहेत. अशा उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी सहकार आयुक्त कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर दि.१०/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

व्यावसायिक चाचणीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांची लघुलेखन व टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी दि.२१/०९/२०२४ व दि.२२/०९/२०२४ रोजी घेण्यात आलेली होती. सदर परीक्षेची गुणवत्ता यादी दि.०४/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात होती.

सदर पदांसाठी घेण्यात आलेल्या १२० गुणांची लेखी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी अशी एकत्रित एकूण २०० गुणांची तात्पुरती गुणवत्ता यादी दि.१२/१२/२०२४ व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांचे कार्यालयाकडील दि.१६/१२/२०२४ रोजी शुध्दीपत्रकान्वये निम्नश्रेणी लघुलेखक या पदाची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांपैकी उपरोक्त पदांसाठी अंतिम निवड करावयाचे उमेदवार व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची विभागनिहाय तात्पुरती निवडसूची या कार्यालयाचे दि.२३.१२.२०२४ चे प्रसिध्दी पत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर तात्पुरत्या निवड सुचीतील उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी/ तपासणी करण्यात आलेली असून उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांची विभागनिहाय **अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी** सहकार आयुक्त कार्यालयाच्या उक्त अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश संबधीत विभागाचे नियुक्ती प्राधिकारी यांचे कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात येतील.

**स्वाक्षरी/-**
**अपर निबंधक,सहकारी संस्था(प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**दि.०७/०२/२०२५**